Historicity Research Journal
Volume 1 | Issue 10 | June 2015 ISSN:- 2393-8900

Research Article

माहितीचा अधिकार, अधिनियम, 2005 – एक अभ्यास

प्रदिप यशवंत पाटील

वरिष्ठ संशोधक विद्यार्थी , मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर..

• प्रास्ताविक :–

'काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देवून खरे स्वराज्य साकार होशार नाही तर सत्तेच्या दुरुपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्वसामान्य जनतेच्या हातामध्ये येईल तेंव्हाच खरे स्वराज्य साकार होईल.' ही महात्मा गांधीजींची इच्छा खऱ्या अर्थाने 12 ऑक्टोंबर, 2005 इ रोजी जम्मू–काश्मिर खेरीज संपूर्श देशामध्ये लागू झालेल्या **'माहितीचा अधिकार अधिनियम, 2005'** या कायद्याने पूर्श झालेली आहे.

माहितीचा अधिकार, अधिनियम, 2005 या नवीन कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिकाला आता संसद सदन सदस्यांच्या बरोबरीचा, माहिती मिळवण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. मात्र हे कोणत्या जादूमुळे नाही, तर ते घडले आहे, **'माहितीचा अधिकार अधिनियम, 2005'** नावाच्या एका कायद्यामुळे. सर्वसामान्य जनता आणि शासान यांचे परस्पर संबंध पूर्णतः वेगळया पातळीवर नेण्याचे सामर्थ्य या कायद्यामुळे नागरिकांना प्राप्त झाले आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाचे स्वरुप समजून घेण्याअगोदर माहितीचा अधिकार म्हणजे काय? हे सविस्तर पाहशे क्रमप्राप्त ठरते.

• माहितीचा अधिकार म्हणजे काय?

कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरशाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार म्हणजे माहितीचा अधिकार होय. अशी व्याख्या या कायद्याच्या संहितेच्या सुरवातीसच केलेली आहे.

तसे पाहता स्वातंत्र्योत्तर काळात केंद्रशासशाने आणि राज्यशासनांनीही जनतेच्या हितासाठी आशि कल्याणसाठी शेकडो कायदे केले. 'जनतेचे हित' हाच त्या सर्व कायद्यांमागील उदात्त हेतू होता. परंतू हे सर्व कायदे करताना शासन सर्वाधिकारी आहे असाच बाहू आतापर्यत करण्यात आला होता. आणि ज्या जनतेच्या भल्यासाठी हे शासन चालते ती जनता दुय्यम आहे, अशी भूमिका कळत नकळतपशे आता पर्यत घेतली गेलेली दिसते. शासनाने केलेले कायदे जनतेच पाळावेत आणि त्यासोबत जनातेकडून त्यांचे पालन होते आहे किंवा नाही, याची शासनाच्या अधिकाऱ्याकडून देखरेख व्हावी अशीच भूमिका त्या कायद्यांमुळे आजवर घेतली गेली आहे. हे आपल्याला आपल्या दैनंदिन कायद्यांच्या अनुभवावरुन लक्षात येते.

पण 'माहितीचा अधिकार अधिनियम, 2005' या कायद्यांची गोष्ट नेमकी उलट आहे. सार्वजनिक प्राधिकरशांचे अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, सरकरी कर्मचारी आपले काम प्रामाशिकपशे करत आहेत की

नाहीत हे आता या कायद्यांमुळे सर्वसामान्या व्यक्ती पाहू शकणार आहे आणि जनतेच्या अपेक्षेला आपश पुरेसे पडतो आहोत की नाही, हे आता शासकीय अधिकाऱ्याना ही तपासता येणार आहे.

आजपर्यंत नेमके काय व्हायचे ? व त्यावर काय केले जायचे? हे माहित असल्यास आपल्यास माहितीचा अधिकार, 2005 या कायद्यांची भूमिका आपल्या लक्षात येते. माहितीचा अधिकार, 2005 कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी फक्त संसदेत व विधानासभांमध्ये जी माहिती मागितली जाई ती माहिती वेळेत आणि तत्परतेने देश्याकडे शासकीय अधिकाऱ्याची इच्छा असायची. सर्वसामान्य व्यक्तिने कोणतीही माहिती मागितली की गोपनियतेच्या अथवा असायची बाबीखाली ती माहिती न देश्याकडेच बहुसंख्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा कल असायचा.

पण आता जी माहिती संसद सदस्याला किंवा राज्य विधापसभेतील सदस्याला नाकारली जाऊ शकत नाही, अशी कोणतीही माहिती कोणाही सामान्य व्यक्तीने मागितली असेल तर संबंधित कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्याने ती माहिती त्या व्यक्तीला पुरविली पाहिजे असे माहिती अधिकार कायदा, 2005 चा कलम 3.3.4 नुसार बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती अधिकाऱ्याने जाणुन बुजून माहिती देश नाकारले अथवा माहिती देण्यास दिरंगाई केली, तर या बाबींची कारशे पुराव्यानिशी सिध्द करायची जबाबदारी या पुढे त्यासंबंधित कार्यालयाच्या माहिती अधिकाऱ्याची असते.

- **माहितीचा अधिकार : जागतिक पार्श्वभूमी**

शासनाचा कारभार पारदर्शक असावा व शासनाच्या कारभाराची जनतेला जास्तीत जास्त माहिती मिळावी या हेतुने अधिक देशांनी माहितीचा अधिकार कायद्याची अंमलबजावशी केलेली दिसते.

1990 पर्यंत माहितीचा अधिकार कायदा जगातल्या फक्त 13 देशांनी राष्ट्रीय स्तरावर स्विकारलेला होता. त्यानंतर आशिया खंडात जपान व दक्षिश कोरियासह विविध राष्ट्रांनी हा कायदा अंमलात आणला, म्हणूनच आज 90 पेक्षाही जास्त देशांनी माहिती अधिकार कायद्याचा संपूर्णतः स्विकार केलेला दिसतो.

माहिती अधिकार कायद्याच्या आंतरराष्ट्रीय संदर्भाची पार्श्वभूमी पाहताना आपल्याला हे लक्षात येते की, जगभर स्विकारलेले महत्त्वाचे तत्व म्हणजेच 'शासन व सर्व शासकीय संस्थाकडे असणारी माहिती' ही सार्वजनिक स्वरुपाची असते व ती पाहण्याचा देशातील प्रत्येक नागरिकाला अधिकार असतो.

माहिती अधिकार कायदा स्विकारणारा पहिला देश म्हणून स्वीडनला ओळखता येईल. या देशाने 1766 मध्ये 'फ्रिडम ऑफ प्रेस ॲक्ट' असा कायदा करुन माहितीचा अधिकार जगात सर्वात प्रथम मान्या केला. याच्याही खुप कालावधीनंतर आमसभेच्या 1948 च्या पहिल्याच अधिवेशनात 'युनिव्हर्सल डिक्लेरेशन ऑफ हयुमन राईटस्' अशी घोषणा केली. 'युरोपियन कन्व्हेन्शन फॉर प्रोटेक्शन ऑफ हयुमन राईटस् ॲण्ड फंडामेंटल फ्रिडम' या कायद्यामधील तरतुरदीनुसार प्रत्येक व्यक्तीचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार मान्य करण्यात आला. 1966 मध्ये 'अमेरिका' या देशाने 'फ्रिडम ऑफ इन्फमेंशन ॲक्ट' असा कायदा केला. 1970 मध्ये 'अमेरिका' या देशाने 'राईट टू इन्फमेंशन ॲक्ट' असा कायदा स्विकारला. 1970 मध्ये नॉर्वे या देशाने 'शासकीय दस्तऐवजी पारदर्शकतेचा नियम' असा कायदा अंमलात आणला. 1971 मध्ये राष्ट्रकूल मंडळाने आणि 1982 मध्ये कॅनडाने या कायद्याचा स्विकार केलेला दिसतो. 1978 मध्ये फ्रान्सने, 1982 मध्ये न्युझिलंडने, 1992 मध्ये ब्राझीलने, 1992 मध्ये स्पेनने, 1999 मध्ये जपानने, 2000 मध्ये दक्षिण आफ्रिका व इग्लंडने, 2002 मध्ये पाकिस्तानने, 2003 मध्ये मेक्सिकोने माहितीचा अधिकार कायदे स्विकारलेले दिसतात. 1992 मध्ये ब्राझील येथे भरलेल्या वसुंधरा परिषदेमध्ये 'आपल्या परिसरात होणारे प्रदूषण व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची माहिती सर्वसामान्य नागरिकाला होणे आवश्यक आहे' असे मानण्यात आले.

1990 नंतर वर्ल्ड बॅक आणि इंटरनॅशलन मॉनिटरी फंड यांच्या आग्रहामुळे मानवी अधिकारांबरोबरच माहितीचा कायदा यालाही महत्त्व देण्यात आले. 1999 मध्ये डरबन (द.आफ्रिका) येथे झालेल्या जागतिक परिषदेत माहितीच्या अधिकाराला स्वतंत्र न्यायिक अधिकाराच्या रूपात लागू कारण्याची सूचना करण्यात आली. चीन सारख्या देशानेही 28 डिसेंबर, 2005 पासून 'दि फ्रिडम ऑफ गर्व्हमेंट लॉ' असा माहितीचा

अधिकार लागू केला आहे. 2005 मध्ये टयुनिश येथे 'माहितगार समाजाच्या अधिकार लागू आहे. 2005 मध्ये टयुनिश येथे 'माहितगार समाजाच्या विश्वसंमेलानात' देखील माहितीचा अधिकार कायद्याचा पुरस्कार करण्यात आला.

याप्रकारे या विकासित देशांच्या पंक्तीत जाऊन भारताने 12 ऑक्टोंबर, 2005 रोजी हा कायदा स्विकारला व जगातला हा कायदा स्विकारणारा 71 वा देश बनला.

- **महितीचा अधिकार : राष्ट्रीय पार्श्वभूमी**

माहितीच्या अधिकाराचा राष्ट्रीय इतिहास जर बघावयाचा झाला तर आपल्याला पुढील बाबींवर प्रकाश टाकावा लागेल.

ब्रिटीशकालीन भारतात 'ऑफिशयल सिक्रेटस ॲक्ट – 1923' (शासकीय गुपीतांचा कायदा) ही कायदा प्रशासकीय परंपरेतील महत्त्वाचा भाग होता. 1923 चा हा कायदा ब्रिटिशांनी मुख्यतः संरक्षण यंत्रणेतील महत्त्वची स्थळे आणि देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित माहिती देण्यावर बंधने घालण्यासाठी केला होता. त्याचप्रमाणे भारतीय प्रशासनावर 'भारतातील पुराव्याचा कायदा – 1872' आणि 'केंद्रीय नागरी सेवा (वर्तणुक) नियम – 1964' अशा कायद्यातील महत्त्वाच्या बाबींचा कायमच प्रभाव राहिला आहे.

तसेच राज्य घटनेतील अनुच्छेद 19 (1) (क) मध्ये भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची तरतुद करण्यात आली आहे. अनुच्छेद 19 (1) (क) नुसार भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामध्येच माहितीचा अधिकार समाविष्ट आहे आणि म्हणूनच माहितीचा अधिकार हा मुलभूत अधिकार आहे असा अर्थ सर्वोच्च व उच्च न्यायालय यांनी भारतातील विविध न्यायनिवाडयात स्वष्ट केला आहे.

उदा. 1) उत्तर प्रदेश विरूध्द राजनारायण व इतर – 1975
2) मेनका गांधी विरूध्द युनियन ऑफ इंडिया – 1978
3) एस.पी.गुप्ता विरूध्द युनियन ऑफ इंडिया – 1982
4) शिला बारसे विरूध्द महाराष्ट्र शासन – 1987 इत्यादी

वरील 1982 च्या महत्त्वपूर्ण निकालात सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले की, शासन प्रणालीबाबत 'माहिती देणे हा नियम व माहिती लपविणे' हा अपवाद आहे. 1987 च्या निकालात न्यायालयाने शिला बारसे यांना कारागृहाती महिलांच्या मुलांच्या संदर्भातील माहिती देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर पहिल्यांदा 1986 मध्ये माहितीच्य अधिकारा कायदा देशाने लागू करावा असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. 1990 मध्ये राजस्थानच्या 'मजदूर किसान शक्ती संघटने' चा प्रयत्न ही खुप महत्त्वाचा होता. श्रीमती अरूणा रॉय व निखिल डे यांनी सामाजिक लेखाजोखा म्हणजे सामाजिक लेखापरिक्षणाच्या माध्यमातून शासकीय कामकाजावर देखरेखे ठेवण्यासाठी 'जन सुनावणी' व 'माहिती अधिकार' असा सुवर्णमध्य सुचवला होता. 1996 मध्ये कर्नाटक, राजस्थान या राज्यांनी, 2001 मध्ये दिल्लीने, 2002 मध्ये आसामने माहितीचा अधिकार कायदा अंमलात आणला.

वरील राज्यांपासून प्रेरणा घेऊन आणि श्री. अण्णा हजारे यांच्या 2001 मधील आंदोलनाचा परिपाक म्हणून महाराष्ट्र राज्याने 2002 मध्ये माहितीचा अधिकार कायदा स्विकारला. आणि त्यात अनेक दुरूस्त्या करून 28 सप्टेंबर, 2003 पासून हा कायदा अंमलात आणला. अशा प्रकारे माहितीचा अधिकार कायदा स्विकारणारे महाराष्ट्रातील 7 वे राज्य होय.

- **माहितीचा अधिकार, अधिनियम, 2005 चे उद्देश**

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकारणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण कारण्याच्या दृष्टीने सार्वजनिक प्राधिकारणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळविता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळवण्याच्या अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता आणि तत्त्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींकरीता तरतुद करण्यासाठी 'माहितीचा अधिकार अधिनियम, 2005' हा कायदा लागु करण्यात आला आहे, या कायद्याचे काही उद्देश पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) शासकीय यंत्रणेच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणणे.
2) शासन कारभारास उत्तरदायित्त्व निर्माण करणे.
3) सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार कमी करणे.
4) सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवण्यासाठी व्यवहार्य शासन पध्दत आखून देणे.
5) केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करणे.

- **महितीचा अधिकार, अधिनियम, 2005 ची मूलतत्वे**

15 जून, 2005 रोजी '**माहितीचा अधिकार अधिनियम, 2005**' रोजी विधेयकाला तत्कालीन **A.P.J. राष्ट्रपती अब्दुल कलम** यांनी मान्यता दिली. त्यानंतर 12 ऑक्टोंबर, 2005 रोजी हा अधिनियम 'जम्मू–काश्मिर' या राज्याला वगळून संपूर्ण देशभरात अंमलात आणला गेला. या अधिनियमाची काही मूलतत्वे सुध्दा या काद्याच्या सुरूवातीसच सांगण्यात आली. ती पुढीलप्रमाणे–

1. प्रशासन / सार्वजनिक प्राधिकरणावर स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करण्याचे कायदेशीर बंधन घालणे.
2. सार्वजनिक प्राधिकारणांनी जास्तीत जास्त माहिती खुली करणे व ती अद्ययावत करून प्रसारित करणे.
3. सद्भावनेने केलेल्या कामाला संरक्षण देणे.
4. सार्वजनिक हिताला सर्वोच्च संरक्षण देणे.
5. माहितीसाठी वाजवी शुल्क आकारणे.
6. माहिती पाहण्याचा व नमुने घेण्याचा यात अधिकार आहे.
7. विहित कालावधीत अर्ज व अपिलावर निर्णय घेण्याचे बंधन असणे.

- **माहितीचा अधिकार, अधिनियम, 2005: स्वरूप**

12 ऑक्टोंबर, 2005 रोजी जम्मू–काश्मिर या राज्याला वगळून संपूर्ण देशभर लागू करण्यात आलेला '**माहितीचा अधिकार, अधिनियम, 2005**' हा कायदा एकूण **6 प्रकरणामध्ये आणि 31 कलमामध्ये** विभागलेला आहे. या कायद्याच्या शेवटी दोन अनुसुची सुध्दा जोडण्यात आलेला आहेत. थोडक्यात त्यांचा आढावा घेणे येथे क्रमप्राप्त ठरते.

प्रकरण 1–'प्रारंभिक'

या प्रकरणामध्ये 1 ते 2 कलमांचा समावेश असून कलम 1 हे या कायद्याचे संक्षिप्त नाव, कायद्याची व्याप्ती व प्रारंभ यांच्याशी संबंधित आहे. तर कलम 2 मध्ये या कायद्याचे संबंधित असणाऱ्या अनेक व्याख्यांचा समावेश आहे. उदा. माहितीचा अधिकार, समुचित शासन, सक्षम प्राधिकारी, अभिलेख, माहिती इत्यादी.

प्रकरण 2–'माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकारणावरील आबंधने'

या प्रकरणात कलम 3 ते कलम 11 अशा एकूण 9 कलमांचा समावेश आहे. कलम 3 हे माहितीचा अधिकारशी संबंधित असून कलम 4 – सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने,

कलम 5 – जन माहिती अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करणे.
कलम 6 – माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे.
कलम 7 – विनंतीचा अर्ज निकालात काढणे.
कलम 8 – माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद.
कलम 9 – विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.
कलम 10 – पृथक्करणीयता
कलम 11–त्रयस्थ पक्षाची माहिती
या विषयांशी संबंधित आहेत.

प्रकरण 3–'केंद्रीय माहिती आयोग.'

या प्रकरणात 12 ते 14 अशी तीन कलमांचा समावेश असून केंद्राप्रमाणेच राज्य माहिती आयोग घटित करणे, त्या आयोगाच्या पदावधी व सेवेच्या शर्ती आणि माहिती आयुक्तांना दूर करण्याची करणे या गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

प्रकरण 4–'राज्य माहिती आयोग'

या प्रकरणात 15 ते 17 अशी तीन कलमांचा समावेश असून केंद्राप्रमाणेच राज्य माहिती आयोग घटित करणे, पदावधी व सेवेच्या शर्ती आणि माहिती आयुक्तांना पदावरून दूर करण्याची भूमिका यातून आलेली आहे

.

प्रकरण 5–'माहिती आयोगांचे अधिकार, कार्ये, अपिल व शास्ती'

या प्रकरणात 18ते 20 अशी तीन कलमे येतात. कलम 18 मध्ये माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये येतात. तर कलम 19 मध्ये नागरिकांचे अपिल व या अपिलावर निर्णय देण्याची सर्वोच्च न्यायालयाची अधिकार क्षमता यांचा समावेश होता.

कायद्याशी संबंधित असणाऱ्या अनेक व्याख्यांचा समावेष आहे. उदा. माहितीचा अधिकार,समुचित शासन,सक्षम प्राधिकारी,अभिलेख,माहिती इत्यादी.

प्रकरण 2–'माहितीचा अधिकार आणि सार्वजनिक प्राधिकरणावरील आबंधने'

या प्रकरणात कलम 3 ते कलम 11 अषा एकूण 9 कलमांचा समावेश आहे. कलम 3 हे माहिती अधिकाराशी संबधित असून कलम 4 – सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने,

कलम 5 – जन माहिती अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करणे.
कलम 6– माहिती मिळविण्याकरिता विनंती करणे.
कलम 7– विनंतीचा अर्ज निकालात काढणे.
कलम 8– माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद.
कलम 9 – विवक्षित प्रकरणात माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.
कलम 10– पृथक्करणीयता
कलम 11 – त्रयस्थ पक्षाची माहिती या विषयांशी संबधित आहेत.

प्रकरण 3 – 'केंद्रीय माहिती आयोग'.

या प्रकरणात 12 ते 14 अशी तीन कलमे असून त्यात केंद्रीय माहिती आयोग घटित करणे, त्या आयोगाच्या पदावधी व सेवेच्या शर्ती आणि माहिती आयुक्तांना पदावरुन दूर करणे या गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

प्रकरण 4 –'राज्य माहिती आयोग'

या प्रकरणत 15 ते 17 अषा तीन कलमांचा समावेश असून केंदाप्रमाणेच राज्य माहिती आायोग घटित करणे पदावधी व सेवेच्या शर्ती आणि माहिती आयुक्तांना पदावरुन दूर करण्याची भूमिका यातून आलेली आहे.

प्रकरण 5 –' माहिती आयोगांचे अधिकार, कार्य, अपिल व शास्ती'

या प्रकरणात 18 ते 20 अषी तीन कलमे येतात. कलम 18 मध्ये माहिती आयोगांचे अधिकार व कार्ये येतात. तर कलम 19 मध्ये नागरिकांचे अपिल व या अपिलावर निर्णय देण्याची सर्वोच्च न्यायालयाची अधिकार क्षमता यांचा समावेश होतो.

कलम 20 मध्ये निर्णय किंवा माहिती देण्यात विलंब झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास शास्ती देण्याची तरतुद आहे.

प्रकरण 6 – 'संकीर्ण'

या प्रकरणात 21 ते 28 अशी एकूण 11 कलमांचा समावेश असून
कलम 21 – सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण देणे.
कलम 22 – अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.
कलम 23 – न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.
कलम 24 – विवक्षित संघटनांना हा अधिनियम लागू नसणे.
कलम 25 – संनियंत्रित करणे व अहवाल देणे.
कलम 26 – समुचित शासनाने कार्यक्रम तयार करणे.

कलम 27 – समुचित शासनाचा नियम करण्याचा अधिकार.
कलम 29 – नियम सभागृहापृढे ठेवणे.
कलम 30 – अडचणी दूर करण्याचा अधिकार.
कलम 31 – कायद्यांशी संबंधित समस्यांचे निरसन.

अशा विषयांचा समावेश होतो.

तसेच या कायद्याच्या शेवटी दोन परिशिष्टे /अनुसूची जोडण्यात आली असून पहिल्या परिशिष्टामध्ये केंद्रीय व राज्य मुख्य माहिती आयुक्त आणि केंद्रीय व राज्य इतर माहिती आयुक्त यांनी घ्यावयाच्या शपथांचा /प्रतिज्ञापत्रांचा नमुना नमुद आहे. तर दुसऱ्या परिशिष्टांमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम,2005 सर अधिनियमापासून वगळण्यात आलेल्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटनांचा समावेश करण्यात आला आहे.

- **महितीचा अधिकार,अधिनियम 2005चे निष्कर्ष :–**

या अधिनियमाचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्श हाती येतात, ते पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) सर्व सामान्य नागरिकांना आवश्यक असलेली माहिती सहजपणे उपलब्ध होवू लागली आहे.
2) शासकीय प्रशासनात एक प्रकारची शिस्त निर्माण झाली आहे.
3)प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीत व कार्यक्षमतेत वाढ झाली आहे.
4) पशासनातील अधिकाऱ्याजवळ या कायद्याच्या काटेकोरपणामुळे पारदर्षकता आली आहे.
5) या कायदयाच्या अमंलबजावणीमुळे दैनंदिन कामकाजातील व प्रशासनातील भ्रश्टाचार कमी झाला आहे.
6) प्रशासनातील कर्मचाऱ्यांची त्यांच्या कार्याविशयीची उदासिनवृत्ती कमी होण्यास मदत झाली आहे.
7)माहिती मागविणाऱ्या अर्जाची माफक फी असल्यामुळे अर्जाची संख्या वाढली असून त्याचा ताण संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांवर पडलेला दिसतो.
8) सर्व सामान्य नागरिकांना हवी असलेली माहिती ठराविक वेळेत उपलब्ध होत आहे. त्यामुळे होणाऱ्या गैरप्रकारांना आळा बसला आहे.
9) पशासनाच्या आणि सरकारच्या विविध योजनांचा उपक्रम लोकांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी या कायद्याची मदत होताना दिसते.
10) प्रशासन कर्तव्यनिश्ठ, जबाबदार व जनताभिमुख बनण्यास मदत झाली आहे.
11) शासनयंत्रणेमध्ये नागरिकांच्या प्रती व्यवहार्य यंत्रणा उभी राहिली आहे.
12) प्रगल्भ लोकशाहीसाठी माहित असलेले नागरिक व नागरिकांचे समूह तयार आहेत.

समारोप :–

प्रशासनामध्ये असणाऱ्या गोपनीय वातावरणाला छेद देऊन माहितीचे खुले प्रवाह सुरु ठेवणे, हे खऱ्या अर्थाने लोकशाही राज्य व्यवस्थेसाठी आवश्यक असल्यामुळै 'माहितीचा अधिकार' अधिनियम,2005 हा कायदा संमत करण्यात आला आहे. या कायद्याच्या अगोदर फक्त सरकारच किंवा प्रशासन जनतेवर देखरेख ठेवित असे. पण या कायद्यामुळे जनता प्रशासनावर अर्थतच सरकारी कामकाजावर लक्ष ठेवू शकते. माहितीचा अधिकार हा अन्न, वस्त्र,निवारा याचप्रमाणे राज्यघटनेतील मुलभूत अधिकार म्हणून मान्य झाला आहे. गोपनियतेच्या संस्कृतीला छेद देऊन 'माहिती देणे' हा नियम व ती टाळणे अपवाद' असे समीकरण कायदा

करताना स्विकारण्यात आलेले आहे यामुळे निश्क्रिय असणाऱ्या पशासनात नक्कीच बदल घडून येईल, असे अभिप्रेत आहे.

संदर्भ ग्रंथ

1) माहितीचा अधिकार अधिनियम,2005–यशवंतराव चव्हाण विकास प्रषासन प्रबोधिनी(यषदा)
2) माहितीचा अधिकार अधिनियम,2005 –चौधरी लॉ पब्लिशर्स
3) माहितीचा अधिकार अधिनियम,2005–राहूल पाटील

नियतकालिके / वर्तमानपत्रे

1) लोकराज्य –जुलै,2014
2) योजना –मार्च,2014
3) दैनिक लोकसत्ता – दि. 3 ऑगस्ट,2014 चा संपादकीय लेख.